# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## विधान भवन, नागपूर - ४४०००१

### विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत नोंदणीकृत महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी

## दरपत्रक

सन २०२५ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु होणार आहे. हिवाळी अधिवेशन कालावधीत खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी नोंदणीकृत (Registered) महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांचे नाव, दर, नग, वजन (ग्राममध्ये) दर्शवून दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२"** यांचे नावे दर्शवून **कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, नागपूर ४४० ००१'** यांच्याकडून दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावी. प्राप्त दरपत्रकांपैकी कोणतेही दरपत्रक स्वीकृत अथवा अस्वीकृत करण्याचा अंतिम अधिकार सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी. दरपत्रकासंदर्भातील नियम व अटी संबंधीत अधिक माहितीसाठी या सचिवालयाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ पहावे.

**दिनांक :- ०८ नोव्हेंबर, २०२५**

**विधान भवन,**
**नागपूर**

# विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत नोंदणीकृत महिला बचत गटांकडून खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यासाठी दरपत्रक नियम व अटी

सन २०२५ चे महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी अधिवेशन नागपूर येथे प्रस्तावित असून अधिवेशन कालावधीत मा.सदस्यांकरीता खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्याकरीता नोंदणीकृत महिला बचत गटांकडून जाहिर दरपत्रक पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत असून त्याबाबतचे नियम व अटी खालीलप्रमाणे आहे.

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्तांकडून खाद्यपेय प्रबंधकांनी स्वत:च्या चारित्र्याविषयी, समाज विघातक प्रकरणात सहभागी नसल्याचे तसेच ते पोलीस विभागाकडे नोंदी असलेल्या आर्थिक अथवा कुठल्याही स्वरुपाच्या गंभीर गुन्ह्याची नोंद नसल्याचे अद्ययावत प्रमाणपत्र सादर करावे व ते प्राप्त करण्यास विलंब लागत असल्यास तूर्त यासंदर्भात स्वत:चे शपथपत्र (Affidavit) सादर करावे व प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करुन घेऊन ते सादर करण्यात यावे. तसेच भागीदार असल्यास सर्व भागीदारांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र अथवा शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) महिला बचत गटासंदर्भातील नोंदणी बाबतची कागदपत्र.

(३) दरपत्रक सादर करतांना दरपत्रकदार महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे रहिवाशी असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

(४) अन्न व औषधी द्रव्ये (FSSAD) प्रशासन विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(५) महिला बचत गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्याबाबतची कागदपत्रे.

.. २/-

(६) दरपत्रक सोबतच्या "परिशिष्ट "अ" मधील दरसूचीमध्ये दिलेल्या तक्त्यात  खाद्यपदार्थांचे नाव, नग, वजन (ग्राममध्ये) दर्शवून दर भरुन सादर करावेत.

(७) यशस्वी निविदाकारास रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) अनामत रक्कम म्हणून डी.डी. च्या स्वरुपात "कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय" यांच्या नावे जमा करावी लागेल.

(८) सदर दरपत्रक मोहोरबंद (Seal Pack) पाकीटातून **"कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,  विधान भवन, नागपूर"** यांच्याकडे **दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत द्यावीत.

(९) दरपत्रक स्वीकृत/अस्वीकृत करण्याबाबतचे सर्व अधिकार सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे असतील.

# परिशिष्ट "अ"

## दरपत्रकासोबत सादर करावयाची खाद्यपदार्थाची सूची व दर

| अ.क्र. | | पदार्थाचे नाव | नग | वजन ग्राम | दर (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | | **नाश्ता** | | | |
| | १. | कांदापोहे | | १०० | |
| | २. | शिरा / उपमा | | १०० | |
| | ३. | कांदाभजी / बटाटा भजी / मिर्ची भजी चटणीसह | | १०० | |
| | ४. | बटाटा वडा (२ नग) चटणीसह | | १०० | |
| | ५. | साबुदाणा वडा (२ नग) दहीसह | | १०० | |
| | ६. | शेंगदाणा लाडू | | २०० | |
| | ७. | स्वीट कचोरी दहीसह | | २०० | |
| | ८. | फराळी चिवडा | | १०० | |
| | ९. | वेफर्स | | १०० | |
| (२) | | **झुनका भाकर** | | १०० | |
| (३) | | **पुरी भाजी चटणीसह** | | | |
| (४) | | **वेज पुलाव सह करी, कोशिंबीर, पापड** | | | |
| (५) | | **थाली** | | | |
| | अ) | **शाकाहारी थाली** (४ चपाती, १ पातळ उसळ / भाजी, १ सुकी भाजी, डाळ-राईस, कोशिंबीर, लोणचे, पापड, दही / ताक) | | | |
| | ब) | **मासांहारी थाली** | | | |
| | १. | चिकन थाली, कोकम कडी किंवा ताक | | | |
| | २. | मटण थाली, कोकम कडी किंवा ताक | | | |
| | ३. | अंडा करी थाली | | | |
| (६) | | **चहा** | | | |
| (७) | | **कॉफी** | | | |
| (८) | | **दही किंवा ताक** | | | |

**दरपत्रकदाराची सही व शिक्का**